Exh. 5/D

किरकोळ दिवाणी अर्ज- 128 /2026

**मे.जिल्हा न्यायाधीशसो कोल्हापूर यांचे कोर्टात.**

| | |
|---|---|
| १. श्री.राजाराम अंतू चौगुले<br>व.व - 45 धंदा – शेती,<br>रा.कोयना कॉलनी गांधीनगर<br>ता-करवीर जि- कोल्हापूर<br>२. सौ.माया राजाराम चौगुले<br>व.व – 40 धंदा – गृहिणी<br>रा.कोयना कॉलनी गांधीनगर<br>ता-करवीर जि- कोल्हापूर | वादी |

विरुद्ध

| | |
|---|---|
| १. कर्मवीर भाऊराव पाटील मल्टीस्टेट<br>कॉ.ऑप,सोसायटी ली.जयसिंगपूर तर्फे<br>शाखा अधिकारी – वळीवडे,<br>२. श्री.प्रकाश हरिभाऊ धुमाळ<br>व.व - 45 धंदा – खाजगी नोकरी<br>रा.कोयना कॉलनी गांधीनगर<br>ता-करवीर जि- कोल्हापूर<br>३. श्री.संभाजी राजाराम आवटे<br>व.व - 45 धंदा – खाजगी नोकरी<br>रा. यळगुड ता- हातकणंगले<br>जि- कोल्हापूर | प्रतिवादी |

Order
Issue show cause
notice to Opponent

ASHISH MANOHAR PATIL
Digitally signed by ASHISH MANOHAR PATIL
Date: 2026.07.02 16:53:53 +0530

PDJ, Kolhapur
02/07/2026

**लवाद आणि सलग्नीकरण अधिनियम १९९६ च्या कलम ३६ (३) अन्वये तसेच सी.पी.सी चे ऑर्डर 39 रूल १,२ व सी.पी.सी चे कलम १५१ प्रमाणे लवाद निवाडा अर्ज 107/2025 च्या अर्जास अंतरिम स्थगिती मिळणेकरिता अर्ज.**

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

**यातील वादी तर्फे अर्ज असा कि**

१. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांचे विरुद्ध लवाद निवाडा अर्ज १०७/२०२५ च्या अर्जास स्थगिती मिळणेकरिता कलम ३४ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

२. यातील प्रतिवादी नंबर १ यांचा लवाद अर्ज हा एकतर्फी असून वादी यांना योग्य समन्स किव्हा नोटीस बजावणी न करता यातील प्रतिवादी नंबर १ यांनी निकाली काढला आहे.

३. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांचे संस्थेकडून घेतलेल्या कर्जास जमीनदार म्हणून प्रतिवादी नंबर २ व ३ असून सदर कामी यातील प्रतिवादी नंबर २ व ३ यांना **ESSENSIAL OF PARTY** म्हणून समाविष्ट करण्यात आलेले आहे.

४. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांचे संस्थेकडून दिनांक १३/०४/२०१८ ई रोजी ५,००,०००/- ( पाच लाख रुपये ) इतके कर्ज घेतलेले होते व आहे.

५. सदरचे कर्ज घेतले नंतर यातील वादी यांनी प्रतिवादी यांचे वेळोवेळी म्हणजेच त्यांचे खातेउतार ( STATEMENT ) आजतागायत 5,,58,501/- इतकी रक्कम प्रतिवादी नंबर १ यांचेकडे भरलेली होती व आहे.

६. यातील वादी यांनी प्रतिवादी नंबर १ यांना त्यांनी आकारलेल्या रकमेबाबत अनेकवेळा लेखी आणि तोंडी कळवून देखील यातील प्रतिवादी नंबर १ यांनी त्यांचा उद्देश साध्य करण्यासाठी जलदगतीने लवाद अर्ज निकाली काढलेला आहे.

७. यातील प्रतिवादी नंबर १ यांनी त्यांचे लवाद अर्ज निकाली काढून वादी यांचे कर्ज अजूनही २,१७,९२८/- इतकी शिल्लक रक्कम आहे असे दाखविले आहे.

८. यातील प्रतिवादी नंबर १ हे बेकायदेशीर निवाडाप्रक्रिया अमलात आणून तसेच चुकीच्या पद्धतीने व्याज आणि दंड आकारणी करून यातील वादी यांचा स्थावर आणि जंगम मालमत्तेवर जप्ती आणण्याचा किव्हा वसुली करण्याची शक्यता/ प्रयत्न आहे.

९. प्रतिवादी नंबर १ यांची बेकायदेशीर असून यातील वादी यांना कोणतीही पूर्वसूचना न देता ex-party आणि नैसर्गिक न्याय तत्वांचा भंग करून यातील प्रतिवादी नंबर १ यांनी सदरची प्रंक्रिया पूर्ण केलेली आहे.

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

१०. यातील प्रतिवादी नंबर १ याचा निवाड्याचा अर्जास तत्काळ स्थगिती मिळाली नाही तर यातील वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे.

११. यातील प्रतिवादी नंबर १ यांनी निवडा अर्जामध्ये २% दंड आणि 12% व्याज अशी एकूण आकारणी 14% केलेली असून सदरची आकारणी हि रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वाच्या विरुद्ध असून अत्यंत जुलमी आहे.

१२. यातील वादी यांनी त्यांचे खातेउतार मध्ये काही रक्कम देखील जमा केलेली आहे. परंतु त्याचा विचार यातील प्रतिवादी नंबर १ यांनी त्यांचे लवाद अर्जात केला नाही असे स्पष्ट दिसते.

१३. त्यामुळे यातील प्रतिवादी नंबर १ यांनी हे चुकीच्या रक्कमेबदल वसुलीचा तगादा लावलेला आहे असे दिसून येते त्यामुळे सदरचा खात्यात DISPUTE आहे असे दिसून येते .

१४. यातील प्रतिवादी नंबर १ हे त्यांचे लवाद अर्जाचा अंमलबजावणी करण्याच्या तयारीत असून यातील वादी यांचेविरुद्ध जप्ती , मालमत्ता जाहीर लिलाव अथवा इतर सक्त वसुली कारवाई होण्याची शक्यता आहे.

१५. सदरची रक्कम हि वाढीव आणि अवाजवी दंड आणि कायद्याच्या मर्यादेबाहेर असल्याचे दिसून येत असून सदर बाबींचा सखोल तपासणी होणे आवश्यक आहे. जर तसे झाले नाही तर यातील वादी यांचे अपुर्नीय नुकसान होणार असून वादी यांचे कधीही भरून न येणारे असे नुकसान( Irreparable of loss ) होणार आहे

१६. प्रथमदर्शनी केस वादी यांचे बाजूने असून कायद्याचा तराजू वादी यांचा बाजूने झुकतो. (balance of convenience)

१७. वादींस तूर्तातूर्त मनाई हुकुम मागतात त्यापाराम्ने न दिलेस सदरचा अर्जात MULTIPLICITY OF PROCEDING गुंतागुंत निर्माण होणार आहे.

१८. सदर कमी वादी यांना प्रतिवादी यांचेकडून कोणतीही कॅव्हेट नोटीस नाही.

**१९. दावेस कारण –**

**सदर दाव्यास कारण असे कि, यातील प्रतिवादी नंबर १ यांनी वादी यांचेविरुद्ध लवाद प्रक्रिया सुरु करून मा.लवाद अधिकाऱ्यामार्फत दिनांक १७/०१/२६ ई रोजी अन्यायकारक व कायद्याच्या तरतुदींना विरोध असा लवाद निर्णय प्राप्त केला आहे.**

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

**सदर लवाद निर्णय हा वादी यांना योग्य संधी न देता रक्कम रुपये २,१७,९२८/- वसूल करणेचा नैसर्गिक न्याय तत्वाचा भंग करून व वस्तूस्थितीचा योग्य विचार न करता दिला असल्याने तो रद्द होणे आवश्यक आहे. सदर कारण दिनांक १७/०४/२०२६ ई रोजी प्रथम निर्माण झालेले आहे त्यानंतर ते आजतागायत चालू आहे..**

२०. यातील वादी तर्फे विनंती कि,

१. यातील प्रतिवादी नंबर १ यांनी दिनांक १७/०४/२०२६ ई रोजीचा लवाद अर्जास सदरचा **मुख्य अर्जाचे अंतिम निकाला पावेतो स्थगिती (stay) मिळावी.**

२. **यातील प्रतिवादी नंबर १ यांनी वादी यांना कोणत्याही प्रकारे सक्तीची वसुली ,जप्ती ,लिलाव अथवा execution कारवाई करण्यास कायम मनाई ताकीद प्रतिवादी नंबर १ यांना व्हावी.**

३. **यातील प्रतिवादी नंबर १ यांनी वादी यांचा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारे विक्री अथवा कोणत्याही प्रकारे बदल करू नये**

४. जरूर तर वादी यांना दावा दुरुस्तीस परवानगी मिळावी.

५. अन्य न्यायचे हुकुम वादी यांचे वतीने मंजूर करणेत यावे.

६. या दाव्याचा कोर्ट खर्च प्रतिवादी यांचेकडून वसूल होऊन वादी यांना देनेबाबत योग्य तो हुकुम व्हावा.

येणेप्रमाणे दावा असे.

कोल्हापूर

ता. १५/०५/२६

मे.जा.व्हावे. M.R. Chougule

प्रतिज्ञा

मी यातील वादी श्री.राजाराम अंतू चौगुले व.व - 45 धंदा – शेती रा.कोयना कॉलनी गांधीनगर ता-करवीर जि- कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो कि, बरील दावेतील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा असे.

कोल्हापूर

Superintendent (Lit.)
District Court, Kolhapur

## ॲफिडेव्हीट

मी यातील मी यातील वादी श्री. राजाराम अंतू चौगुले, व.व. 45, धंदा: शेती, रा. कोयना कॉलनी, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर शपथेवर कथन करतो की, वरील अर्जातील मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हीट.

कोल्हापूर.

ता. 15/05/2026

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो,

ॲड.निलेश ज्ञानू पवार

## प्रतिज्ञा

मी यातील मी यातील वादी श्री. राजाराम अंतू चौगुले, व.व. 45, धंदा: शेती, रा. कोयना कॉलनी, गांधीनगर, ता. करवीर, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

कोल्हापूर.

ता. 15/05/2026

Solemnly Affirmed before me by
Shri. Rajaram Antu Chougule
of Gandhinagar, Kolhapur who is
identified by Shri. N. N. Pawar Adv.
whom I know personally
Dated :- 15.5.26

Superintendent